## बांधकाम विभाग मुख्यालय जव्हार, जिल्हा परिषद पालघर

**११०, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, पालघर, बोईसर रोड, पालघर, जि. पालघर**

**इमेल आयडी - eepzpjawhar@gmail.com**


जाक्र.पाजिप/बावि/वशी/का.वा./८०५ /२०२६ दिनांक: ११/०५/२०२६

प्रति,

१. गट विकास अधिकारी, पंचायत समिती.......... (सर्व)

२. उप अभियंता/ बांधकाम/ पाणीपुरवठा/ लघु पाटबंधारे उपविभाग .......... (सर्व)

**विषय :- कामवाटप करिता कामांची यादी प्रसिध्द करणे बाबत**
**काम वाटप दिनांक २०/०५/२०२६ सका. ११:०० वाजता**

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र.निविदा-२०२१ प्र.क्र.७८/बांध-४ दिनांक २७.५.२०२१
२. मा. अति.मु.का.अ. जि.प.पालघर यांचेकडील दिनांक ११.०५.२०२६ रोजीचा मंजुर प्रस्ताव

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये जिल्हा परिषद पालघरअंतर्गत मंजुर कामांपैकी रक्कम रु. १० लक्ष च्या आतील विकास कामांच्या प्रशासकीय मान्यता आदेश असलेल्या सोबत जोडेलेल्या यादीतील कामांचे **दिनांक २०/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता जननायक बिरसा मुंडा सभागृह दालन क्र.२१२ जिल्हा परिषद पालघर** येथे लॉटरी पध्दतीने वाटप होणार आहे. उपरोक्त यादी दिनांक १२/०५/२०२६ रोजीपासुन ekamwatappalgharzp.in हया Link वर उपलब्ध होईल. तरी कामवाटप प्रक्रीयेमध्ये भाग घेण्यासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन केलेल्या सर्व पात्र नोंदणीकृत म.का.स.स. व सु.बे.अ. यांना योग्य ती प्रचार व प्रसिध्दी करून जास्तीत जास्त म.का.स.स. व सु.बे.अ. भाग घेतील असे पाहावे.

**उपरोक्त कामवाटप प्रक्रीयेमध्ये ekamwatappalgharzp.in हया Link वर दिनांक १६/०५/२०२६ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत निविदा मागणी व निविदा फी स्विकारण्यांत येईल.** तरी आपल्या तालुक्यातील सर्व म.का.स.स. व सु.बे.अ. यांना आपले स्तरावरून याबाबत अवगत करावे. तसेच उप अभियंता यांनी सदर कामवाटपाची यादी प्रसिध्द करून, तसा प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**सोबत**:- कामांची लेखाशिर्ष निहाय कामवाटप यादी जोडलेली आहे.

**सचिव**
**कामवाटप समिती तथा**
**कार्यकारी अभियंता**
**जिल्हा परिषद, पालघर**